# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/11/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत रिधोरा येथे दिनांक ०१/११/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०२/११/२०२३ चे १०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– खुशाल चिंतामण कुरेकर, वय ४० वर्ष, रा. रिधोरा ता. काटोल याचा मंडप डेकोरेशनचा व्यवसाय असुन त्याचे साहीत्य गावातील ग्रामविकास विदयालयाचे पाठीमागे मोकळया जागेत ठेवलेले राहते. यातील आरोपी नामे– १) सौरभ ढोबळे वय १९ वर्ष, २) करण वाघ वय १८ वर्ष, दोन्ही रा. रिधोरा ता. काटोल यांनी संगणमत करून ठेवलेल्या साहीत्यातुन मंडप डेकोरेशनचे १३ पिल्लर पाईप किंमती १३०००/–रू. व २० पाईप लोखंडी किंमती १००००/– रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भोजराज झाडे हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ५०० मीटर अंतरावर मौजा तालुका कृषी अधिकारी कार्यालय कुही येथे दिनांक ०१/११/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– राहुल भिमराव सोरदे, वय ४३ वर्ष, रा. ह. मु. प्लाट नं. २१ रामकृष्ण नगर दिघोरी, महेश निमजे यांचे घरी किरायाने ता. नागपुर हे दि. ०१/११/२०२३ दरम्यान सकाळी ११.०० वा. ऑफिस मध्ये पोहचले व शासकिय कामकाज केले त्यानंतर सायंकाळी ०४.०० वा. चे सुमारास फिर्यादी निवडणुकिच्या कामानिमित्य तहसील कार्यालय येथे तळमजल्यावर गेले. फिर्यादीचा वरील लॅपटॉप त्याचे ऑफिस टेबलवर होता फिर्यादीचे निवडणुकिचे तहसील कार्यालय येथील काम आटपुन फिर्यादी ०५.०० वा. चे सुमारास आपले ऑफिसला गेले असता फिर्यादीच्या टेबलावर ठेवलेला ऐसर कंपनीचा ट्रॅव्हलमेट ४७५०/४३५० सिरीजचा मॉडेल नं. एम.एस २३३५ किंमती अंदाजे २०,०००/– रुपये लॅपटॉप दिसुन आला नाही. फिर्यादीने आपल्या ऑफिसमध्ये शोध घेतला व त्याचे सहकाऱ्यांना विचारपुस केली परंतु लॅपटॉप मिळुन आला नाही तो कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे अज्ञात आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पालीस हवालदार हरिदास चाचेरकर पोस्टे कुही मो. नं. ९९२२९०३४८५ हे करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा :–** दिनांक ०१/११/२०२३ चे सकाळी १०.०० वा. दरम्यान फिर्यादीची मुलगी हिचा इंग्रजी विषयाचा पेपर असल्याने फिर्यादीने तिला मोटार सायकलने इंगोले हायस्कुल भारसिंगी येथे सोडुन दिले व घरी परत येवुन मावस भावाच्या मुलाचे साक्षगंध असल्याने काटोल येथे पत्नीसह निघुन गेले सायंकाळी ०५.०० वा. परत आले तेव्हा मुलगी ही फिर्यादी जवळ येवुन रडायला लागली म्हणून फिर्यादीने तिला का बर रडते असे विचारले असता तिने सांगीतले की, मी दुपारी अुदाजे ०२.३० वा. चे दरम्यान पेपर सोडवुन एकटीच पायदळ रोडने घरी परत येत असतांना एक पांढऱ्या रंगाची चार चाकी गाडी माझे मागुन येवुन समोर उभी झाली व त्या गाडीमध्ये मोसंबी भरलेली होती तसेच गाडीला मागुन पाटी लावलेली होती व गाडीचे साईडला सदगुरू ट्रान्सपोर्ट असे लिहलेले होते फिर्यादीची मुलगी त्या गाडीसमोर आली असता त्या गाडीमधुन एक ईसम वय अंदाजे २५ वर्ष हा गाडीतुन उतरून फिर्यादीचे मुलीचे पाठीमागुन आला व फिर्यादीचे मुलीला स्पर्श केला व ओढतान करीत असता तेवढयाच त्याच रोडने एक व्यक्ती ज्याचे नाव माहीत नाही त्यांनी फिर्यादीच्या मुलीला त्याचे पासुन सोडविले तेव्हा फिर्यादीच्या मुलीने त्या ईसमाला पाहीले असता त्याने अंगात ग्रे रंगाची टि शर्ट घातलेली होती त्याचे गळयात काळा आणि शेंदरी रंगाचा देवाचा धागा होता तसेच तो अंगाने सडपातळ होता असे फिर्यादीला त्याच्या मुलीने घरी येवुन सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादवि., सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चौधरी ठाणेदार जलालखेडा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**